एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक - विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

रविवार, दिनांक ३ जानेवारी, २०२१

वेळ :- सकाळी १०.३० ते दुपारी १.००

**(एकूण गुण १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

गुण

प्रश्न क्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. २०

व्हेनिस हे त्या गाडीचे अखेरचे स्टेशन होते. त्यामुळे ते रेल्वेचे दोन नोकर 'ऑल आऊट' असे इंग्रजीतून आणि त्याच अर्थी इटालियन व फ्रेंचमधून ओरडत डब्या-डब्यांतून फिरत होते. त्या अमेरिकन म्हाता-यांजवळ चिकार सामान होते. व्हेनिसला बि-हाड बदलायच्या इरादयानं आल्यासारखे, त्यामुळं त्यांनी दोन पोर्टर्स बोलावले. मी त्या स्त्रियांचे औपचारिक आभार मानून माझी छोटी बॅग घेऊन निघालो. स्टेशनच्या बाहेर येऊन पाहतो तर रस्ता नव्हताच! होता तो एक प्रचंड कालवा, एखादया विस्तीर्ण नदीसारखा. हाच तो ग्रॅंड कॅनॉल. त्यात अनेक पॉटर टॅक्सी म्हणजे लहान मोटर लॉचीस आणि मोठ्या यांत्रिक नावा उभ्या होत्या. 'व्हेनिझिया-व्हेनिझिया, पियाझा-पियाझा' असा त्यांचा पुकार चालला होता. टॅक्सीपेक्षा बस स्वस्त पडणार हे सांगायला काही अर्थतज्ञ लागत नाही. मी अडीचशे लिरांचे बोटीचे तिकीट काढले. दोन एकशे प्रवासी पोटात घेऊन आमची नाव जोरात निघाली.

ते वातावरण अतिशय प्रसन्न होते. विशाल कालव्यावर अनेक उत्साही प्रवासी वेगाने जा-ये करत होते. हायवेवर वाहनांची वाहतूक चालावी तशी त्या जलमार्गावर नावांची धावपळ चालली होती. अनेक प्रकारच्या नावा कालव्यातून चालल्या होत्या. हवेत गारवा होता, वा-यात उत्साह होता, मनात संगीत होते आणि सभोवार पसरलेल्या पाण्यात तारूण्य होते. रोमला भेटलेला एक इटालियन लेखक मला म्हणाला होता ते खरेच होते. 'व्हेनिस हे जगातलं एकच असं शहर आहे, की त्याचं वर्णन करता येत नाही. तिथं प्रत्यक्षात गेलं पाहिजे. तिथली हवा खाल्ली पाहिजे. तिथं राहिलं पाहिजे. तरच तुम्हांला व्हेनिस म्हणजे काय ते समजेल.

कारण हे पाण्यातले असे जगातले एकमेव अद्‌भुत शहर आहे. ज्या शहरात एकही मोटार नाही. वाहतूक नियंत्रण करणारा पोलीस नाही. ट्रॅफिक लाईट्स नाहीत आणि रस्त्यावर धक्काबुक्की नाही असे हे जगातले एकमेव शहर, कारण याला ख-या अर्थाने रस्तेच नाहीत. आहेत ते कालवे - फक्त कालवे आणि त्यांना जोडणारे पूल. आईच्या गळ्यात मुलाने हात टाकावा असे हे पूल. लाडिक, प्रेमळ. हा गाव म्हणजे रूढ

[ उलटून पहा. ]

अर्थाने शहर नव्हेच, तर अनेक छोट्या बेटांचा पुंजकाच आहे. निळ्या मखमली सागरावर टाकवेल्या हि-या-माणकांच्या ढिगासारखा हा लांबून दिसतो. मधूनच चर्च किंवा जुना राजवाडा यांची टोके आभाळात घुसतात. ग्रँड कॅनॉलच्या किना-यावर खुर्च्या टाकलेल्या. चार खुर्च्यांच्यामध्ये टेबल आणि त्यावर रंगीबेरंगी प्रचंड छत्री. या खुर्च्यांवर बसून कॉफी घेत समोरून सरकणा-या विविध आकारांच्या आणि अनंत प्रकारांचे उतारू वाहून नेणा-या नावांची ये-जा पाहत बसायचे. तीच गंमत या नावांतून प्रवास करणा-यां नाही पाहायला मिळते. डेकवर येऊन किना-यावरच्या निरूद्योगी संथ, शांत, चित्रविचित्र प्रवाशांच्याकडे पाहत पुढे-पुढे सरकायचे. हे शहर निरूद्योगांसाठीच आहे यात शंका नाही, कारण इथे येणा-या प्रवाशांना कसलीही घाई-गर्दी नसते. न्यूयॉर्क, मुंबई, हॉंगकॉंग अशा शहरांतल्या धावपळीपासून हे निवांत शहर सर्वस्वी अलिप्त आहे.

व्हेनिसचे रस्ते म्हणजे पाणरस्ते असतात याची कल्पना नसलेला एक मुनीम एकदा लंडनहून व्हेनिसला विमानाने आला. रस्त्यावर सगळीकडे पाणी झालेले पाहून त्याने आपल्या मालकाला तार केली, "व्हेनिसमध्ये पूर आला आहे. सगळे रस्ते पाण्यानं तुडुंब आहेत. परत येऊ की पूर ओसरेपर्यंत वाट पाहू ते कळवा!"

व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन! व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचेच नव्हे तर कालव्यातही तरंगणारे शहर! एक प्रचंड उत्साह आणि उत्सव! दोन दिवसांच्या निवांत मुक्कामानंतर हे गोड, कलासक्त आणि निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर सोडताना मनाला खूपच हुरहुर वाटली.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : -

(अ) व्हेनिस म्हणजे हि-या माणकांच्या ढिगासारखा बेटांचा पुंजका.......
(ब) व्हेनिस म्हणजे निरूद्योगी शहर संकल्पना स्पष्ट करा.
(क) व्हेनिसच्या स्टेशनबाहेरचा परिसर कसा आहे?
(ड) व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन संकल्पना स्पष्ट करा?
(इ) व्हेनिस म्हणजे अवर्णनीय शहर असे का म्हटले आहे?

प्रश्न क्र.२ गट "अ" मधील वाक्प्रचारांची गट "ब" मधील अर्थाशी समान जुळणी करा. १०

| "अ" गट | "ब" गट |
|---|---|
| (अ) स्तुती करणे | (१) एखाद्या ठिकाणी जाण्यास निघणे |
| (ब) प्रयाण करणे | (२) अस्वस्थ वाटणे |
| (क) बेभान होणे | (३) उत्सुक असणे |
| (ड) हुरहुर वाटणे | (४) खूप आनंद होणे |
| (इ) वंचित राहणे | (५) विरस होणे |

[ उलटून पहा. ]

गुण

| | |
|---|---|
| (फ) मान खाली जाणे | (६) खूप प्रेम करणे |
| (ग) उकळ्या फुटणे | (७) कौतुक करणे |
| (ह) मायेची पाखर घालणे | (८) एखादी गोष्ट न मिळणे |
| (य) आतुर होणे | (९) शरमेने मान झुकणे |
| (र) हिरमोड होणे | (१०) भान विसरणे |

प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचा वाक्यात उपयोग करा. १०

| | |
|---|---|
| (अ) सहल | (ब) जत्रा |
| (क) क्रिकेट | (ड) प्रयोग |
| (इ) गोड | (फ) वैद्य |

प्रश्न क्र.४ पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे लिहा. २०

(१) इंग्रजांनी देऊ केलेली मुंबई - ठाणे रेल्वे प्रवासाची इनामे काही दिवसांनी का बंद करण्यात आली?
(२) काझीरंगा अभयारण्याची भौगोलिक वैशिष्ट्ये सांगा.
(३) ऑलिंपिक ध्वज कोणता संदेश देतो?
(४) एडिसनने बांबूपासून कार्बन तयार करण्याचा विचार का केला?
(५) सखू आजीचा करारीपणा स्पष्ट करा.
(६) नानांनी लावलेले अक्षरी कुलूप कुचकामी का ठरले?

प्रश्न क्र.५ कोणत्याही एका पाठाच्या / कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार) १०

(अ) 'ते जीवनदायी झाड' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.
(१) लेखकाला लिंबाचे झाड जीवनदायी का वाटले?
(२) पारव्याची जोडी लिंबाच्या झाडावर का राहते?
(३) लेखकाला खिडकी लावून घ्यावी असे का वाटले?
(४) पारव्याचे जोडपे हळूहळू दिसेनासे का झाले?
(५) झाडाच्या आसपास कोणाकोणाचे वास्तव्य असल्याचे लेखकाने नमूद केले आहे?

किंवा

(ब) 'पुन्हा एकदा' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.
(१) 'पुन्हा एकदा' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.
(२) 'पुन्हा एकदा' या कवितेतून कोणता संदेश मिळतो?
(३) 'पुन्हा एकदा' या कवितेची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

[ उलटून पहा. ]

गुण

(४) 'मातीत माती व्हावी एक', 'पुसून टाकीत भेदाभेद' या काव्यपंक्तीतील सामाजिक आशय स्पष्ट करा.

(५) 'पुन्हा एकदा' या कवितेचा तुम्हांला समजलेला भावार्थ स्पष्ट करा.

प्रश्न क्र.६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा. ५

(१) Enthusiasm
(२) Stay
(३) Heap
(४) Innumerable
(५) Inspiration
(६) Famine

(ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच संख्या अक्षरात लिहा. ५

(१) ४६२४
(२) ८१० + ३० = ८४०
(३) ६७०    २५ = ६४५
(४) ३५ × १० = ३५०
(५) ३६० ÷ १८ = २०
(६) ९६.२

(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा. १०

(१) माझ्या सर्व ...........त्याची आकलनशक्ती फारच दांडगी होती. ( विद्यार्थी )
(२) चिलखत घालून...........उभ्या असलेल्या एखाद्या विशालकाय योद्ध्यासारखा. ( पहारा )
(३) भारताने ........स्पर्धेत अनेक वर्षे अजिंक्यपद टिकवले. ( हॉकी )
(४) बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनच्या ...........आफ्रिका खंडात हजारो मैल पायी प्रवास केला. ( सहकारी )
(५) ..........कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता. ( तिजोरी )
(६) पक्ष्यांच्या .......... अभ्यास करणे, ही काही सोपी गोष्ट नाही. ( स्थलांतर )
(७) विशाल.......अनेक उत्साही प्रवासी वेगाने जा - ये करत होते. ( कालवा )
(८) फुलांपासून ते फळांपर्यंतचा सगळा जीवनप्रवास त्या ..........मला पाहायला मिळाला नाही. ( झाड )
(९) श्री गोळीवडेकर मास्तर मला मराठी .......होते. ( पाचवी )
(१०) ..........नव्यानं आलेल्या या शब्दांनी माझ्या भावविश्वात पालवी फुटली. ( आयुष्य )
(११) ..........खेळातसुद्धा जातपात मानली जात असे. ( कुस्ती )

प्रश्न क्र.७ (अ) पुढीलपैकी कोणतेही तीन शब्द शुध्द करून लिहा. ३

(१) देशभक्ति
(२) निर्मुलन
(३) आधूनीक
(४) किर्तन

[ उलटून पहा. ]

गुण

(ब) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे वचन बदला. ३

(१) घरटे

(२) गाणे

(३) सफरचंद

(४) आंबा

(क) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. ३

(१) एकेरी

(२) पौर्णिमा

(३) नावड

(४) विलायती

(ड) कंसातील सूचनेप्रमाणे एक वाक्य बदलून लिहा. १

(१) पण एक दिवस असा येईल की, हे सारे नष्ट होईल. ( काळ ओळखा. )

(२) <u>चांगल्या</u> सवयी केवळ स्वप्रयत्नाला चालना देत नाहीत.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

--------------*-------------------*----------

**एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन - सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक ३ जानेवारी, २०२१

वेळ :- दुपारी २.१५ ते सायंकाळी ५.००

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

**१. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा.** **२०**

(अ) फॅशनचे वेड

(ब) पाऊस आणि मानवी जीवन

**२. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा.** **२०**

(अ) एकविसाव्या शतकाची आव्हाने या विषयावर चर्चा करा.

(ब) स्त्री - पुरूष समानता काळाची गरज यांविषयी चर्चा करा.

**३. पुढीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा.** **३०**

(अ) शिक्षकपदाच्या बिंदूनामावलीची तपासणी करणेबाबत परिपत्रक तयार करा.

(ब) ठाणे मनपा क्षेत्रातील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२०२० सुरू करण्याबाबतचे प्रसिध्दिपत्रक तयार करा.

(क) खाजगी मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळांतील फक्त सन २०१९-२०२० वाढीव पदांचे प्रस्ताव शिक्षण संचालककाकडे सादर करा.

**४. पुढीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही पाच संज्ञांचे मराठी पर्याय द्या.** **१५**

**"अ" गट**

(अ) Auditor — (ब) Senate

(क) Meteorology — (ड) Verification

(इ) Nationalism — (फ) Iceberg

गुण

**"ब" गट**

(अ) Labour welfare
(ब) Thesis
(क) Share certificate
(ड) Guest House
(इ) Felicitation
(फ) Increment

**"क" गट**

(अ) Broadband
(ब) Layout
(क) Superintendent
(ड) Incentive
(इ) Utility
(फ) Enrolment

**५. खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा.** **१५**

(अ) Oath or affirmation by the Governor.
(ब) Conduct of business of the Government of a State.
(क) Vacation and resignation of, and removal from, the offices of Speaker and Deputy Speaker.
(ड) Constitution of Municipalities.
(इ) Taxes not to be imposed save by authority of law.
(फ) Admission or establishment of new States.

------------------------